महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ; desk८@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

पत्र क्र. ०८/व्हिओसी/मान्यता/२०२१/४०६ दिनांक :- ४ ऑक्टोबर, २०२१

ईमेलव्दारे

## परिपत्रक

विषय:- पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांसाठी संगणकीय प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या अंतिम मान्यतेच्या पत्राबाबत...

संदर्भ:-

१. शासन निर्णय क्र.व्हिओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४ दि.१०.०५.२०१८

२. शासन पत्र क्र.व्हिओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४ दि.१२.०६.२०२०

संदर्भाधीन (०१) शासन निर्णयान्वये पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांस परवानगी देण्यासाठीच्या ऑनलाईन प्रमाणित कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे.

२. त्यानुसार संचालनालयाच्या https://vti.dvet.gov.in या संकेतस्थळावर पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ सतरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्याकसक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास अर्ज सादर केलेल्या संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेले दस्तऐवज व हमीपत्राच्या आधारे संगणकीय प्रणालीव्दारे अंतिम मान्यता दि.२० जानेवारी, २०२० पर्यंत देण्यात येत होती. तथापि, संदर्भाधीन (०२) येथील शासन पत्रान्वये सदर कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात करण्यात आलेली आहे.

३. यास्तव दि.२१ जानेवारी २०२० नंतर पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नविन संस्था व अधिकच्या तुकडयांना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास स्वतंत्र शासन निर्णयाव्दारे अंतिम मान्यता देण्यात येत आहे.

४. सबब, दि.२१ जानेवारी २०२० नंतर संचालनालयाच्या https://vti.dvet.gov.in या संकेतस्थळावरील संगणकीय प्रणालीव्दारे प्राप्त झालेले अंतिम मान्यता पत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच संकेतस्थळावरील संगणकीय प्रणालीव्दारे प्राप्त होणारे इरादापत्राच्या आधारे प्रवेश करण्यात येवू नये. सदर इरादापत्रातील मुद्दा क्रमांक १० मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की “सदर इरादापत्र अभ्यासक्रम चालविण्यासाठी मान्यता पत्र नसून संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण केल्याशिवाय मान्यता पत्र निर्गमित करण्यात येणार नाही” तसेच सदर इरादापत्राच्या किंवा दि.२१ जानेवारी २०२० नंतर संगणकीय प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या अंतिम प्रवेश मान्यता पत्राच्या आधारे प्रवेश केल्यास सदर प्रवेश अनधिकृत प्रवेश म्हणून ग्राहय धरण्यात येवून सदर संस्थेवर कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र

व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(दि.अं.दळवी)
संचालक

प्रत:- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

१. मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

३. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालये

४. सर्व प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

५. मेसर्स, तलिस्मा कार्पोरेशन लि.

/- यांना कळविण्यात येते की, या कार्यासनाच्या दि.०४.०३.२०२१ टिप्पणीन्वये कळविण्यात आल्याप्रमाणे सुचनापत्र निर्गमित करण्यात येतील याबाबत दक्षता घेण्यात यावी.

e:\pk\data 2021\pk- ro letter 2021.docx